स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

ग्राम विकास व पंचायत राज विभाग

**महाराष्ट्र शासन**

## ग्राम विकास व पंचायत राज विभाग

७ वा मजला, बांधकाम भवन, मर्झबन रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

Email ID :- maharddat75@gmail.com

जा.क्र./प्रआयो-२०२३/प्र.क्र.13१ /योजना-१० दि.२३/०५/२०२३

प्रति,

**कार्यकारी अध्यक्ष,**
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व).

**विषय :- ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या Performance Review Committee (PRC) बैठकीमध्ये प्राप्त झालेल्या सूचनाबाबत...**

संदर्भः- ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे Performance Review Committee बैठक दि.१८/०५/२०२३.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये, दि. १८ मे, २०२३ रोजी मा. सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्यामार्फत Performance Review Committee बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये त्यांनी दिलेल्या सूचना पुढीलप्रमाणे आहेत.

१. **प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे.**

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ज्या पात्र लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नाही, अशा भूमिहीन लाभार्थ्यांना दि. ३० जून, 2023 पर्यंत जागा उपलब्ध करुन देणे व त्यांना पहिला हप्ता तात्काळ वितरीत करणे. अन्यथा सदर भूमिहीन लाभार्थ्यांचे उद्दिष्ट इतर राज्यांना वितरीत करण्यात येईल.

२. **प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत उर्वरित हप्ते वितरीत करणे.**

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ज्या मंजूर घरकुल लाभार्थ्यांना पहिला, दुसरा, तिसरा व चौथा हप्ता वितरीत करणे प्रलंबित आहे, अशा लाभार्थ्यांना दि. ३१ मे, 2023 पर्यंत उर्वरित सर्व हप्ते तात्काळ वितरीत करणे.

३. **प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण प्रलंबित (Delayed) घरकुले पूर्ण करणे.**

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ज्या लाभार्थ्यांना पहिला, दुसरा व तिसरा हप्ता वितरीत करण्यात आला आहे. परंतु अद्याप सदर घरकुले प्रलंबित (Delayed) आहेत, अशी सर्व घरकुले दि.१५ ऑगस्ट, 2023 पर्यंत पूर्ण करणे.

**४. इंदिरा आवास योजना अंतर्गत अपूर्ण घरकुले पूर्ण करणे.**

इंदिरा आवास योजनेंतर्गत सन २०१४-१५ व त्यापूर्वीची भौतीकदृष्ट्या पूर्ण असलेली परंतु आर्थिकदृष्ट्या अपूर्ण असलेल्या २६,९४६ घरकुलांची Single Page Entry Module मध्ये नोंदणी करण्यात आली आहे. परंतु अद्यापर्यंत त्यांना हप्ते वितरीत करण्यात आलेले नाही. अशा घरकुलांना दि. ३१ मे, २०२३ पर्यंत सर्व हप्ते वितरीत करणे. तसेच इंदिरा आवास योजनेंतर्गत भौतिक व आर्थिकदृष्ट्या अपूर्ण असलेली घरकुले दि. ३० जून, २०२३ पर्यंत पूर्ण करणे.

**५. ग्रामीण गवंडी प्रशिक्षण.**

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण तात्काळ पूर्ण करुन त्यांचे मुल्यांकन (Assessment) त्वरीत पूर्ण करुन घेणे. जेणेकरुन प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त ग्रामीण गवंडी प्रशिक्षण उद्दिष्ट मिळणे सोयीचे होईल.

**६. Area Officer App.**

ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी एरिया ऑफिसर मॉनिटरींग व्हिजिट ॲप उपलब्ध करुन दिलेला असून जिल्ह्यांकडून त्याचा वापर होत नसलेबाबत नाराजी व्यक्त केली आहे. तसेच प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत जिल्ह्यातील क्षेत्रिय भेटी देणाऱ्या अधिकाऱ्यांना एरिया ऑफिसर मॉनिटरींग व्हिजिट ॲपचा जास्तीत-जास्त वापर करण्यात यावा. तसेच प्रत्येक महिन्याला जिल्ह्यातील किमान १० फिल्ड व्हिजिट करुन त्याचे फोटो सदर ॲपमध्ये अपलोड करण्यात यावे.

**७. कृतिसंगम (Convergence).**

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत पूर्ण झालेल्या घरकुलांच्या लाभार्थ्यांना इतर योजनांचा जसे- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, स्वच्छ मिशन-ग्रामीण, जल जीवन मिशन, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, सौभाग्य योजना, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती मिशन, महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाउर्जा), इ. शासकीय योजनांशी १००% कृतीसंगम करणे.

**८. Aadhar Payment Bridge.**

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ज्या लाभार्थ्यांचे Aadhaar Payment Bridge (APB) प्रक्रिया अपूर्ण आहे. अशा उर्वरित सर्व लाभार्थ्यांचे आधार सिडींग पूर्ण करणे व PFMS द्वारे प्रमाणीकरण करुन घेणे. तसेच ज्या लाभार्थ्यांचे आधार सिडींग आणि प्रमाणीकरण PFMS द्वारे अयशस्वी झाल्यास, त्यांचा आधार क्रमांक व इतर तपशील दुरुस्त करणे.

दि. १५ ऑगस्ट, २०२३ रोजी पर्यंत सर्व हप्ते वितरण Aadhaar Payment Bridge Platform वर आणण्यासाठी ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी अंतिम मुदतवाढ दिलेली आहे. त्यानंतर सर्व हप्ते वितरण हे Aadhaar Payment Bridge (APB) प्रक्रियेद्वारेच होणार आहे.

९. **CPGRAM Portal.**

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत CPGRAM Portal वर प्राप्त होणाऱ्या तक्रारी तात्काळ निकाळी काढून त्याचा अनुपालन अहवाल CPGRAM Portal वर एक आठवड्यात अद्यावत करणे.

तरी याबाबत सत्वर कार्यवाही करण्यात यावी. याबाबत मी स्वतः आढावा बैठक घेणार आहे.

**(राजेश कुमार, भा.प्र.से.)**
अतिरिक्त मुख्य सचिव,
ग्रामविकास व पंचायत राज विभाग

**प्रत** :

१. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
२. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना कार्यवाहीस्तव.
३. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व) यांना कार्यवाहीस्तव.